गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १२१ वा | सोमवार १८ सप्टेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 121 | Date : 18/09/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4




## भारत आशिषा चषकाचा आठव्यांदा मानकरी

कोलंबो : आशिया चषक २०२३ च्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेवर १० गडी राखून विजय मिळवला. भारताच्या गोलंदाजीसमोर श्रीलंकेची फलंदाज पत्त्यांसारखी कोसळली. श्रीलंकेचा पराभव करत भारताने पाच वर्षांनंतर आशिया कपवर नाव कोरलं. भारताने सर्वाधिक २६३ चेंडू राखून श्रीलंकेवर विजय मिळवत नवा विक्रम रचला.

या दमदार विजयानंतर विजेत्या संघाला बक्षीस म्हणून मोठी रक्कम मिळाली आहे. सामन्यात भेदक मारा करुन सहा विकेट घेणाऱ्या मोहम्मद सिराजला 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार देण्यात आला.

श्रीलंकेला टीम इंडियाने फक्त ५० धावांमध्ये ऑलआऊट केलं. श्रीलंकेचे अवघ्या १५.२ षटकांत सर्व गडी बाद झाले. भारताने ५१ धावांचं लक्ष्य केवळ ६.१ षटकांत पूर्ण केलं आणि दणदणीत विजय मिळवला. आशिया चषक २०२३ विजेत्या टीम इंडियाला १,५०,००० डॉलर्स बक्षीस म्हणून मिळाले. १,५०,००० यूएस डॉलर्स म्हणजे १,२४,६३,५५२ रुपये. यासोबतच उपविजेत्या श्रीलंकेच्या संघाला म्हणून ७५,००० डॉलर्स रक्कम म्हणजेच सुमारे ६२,३१,७७६ रुपये एवढी रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली आहे. आशिया कप २०२३ मध्ये भारतीय संघाच्या गोलंदाजांची चांगली कामगिरी पाहायला मिळाली. कुलदीप यादवला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा किताब मिळाला. आशिया कप २०२३ मध्ये कुलदीप यादवने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात पाच बळी आणि त्यानंतर श्रीलंकेविरुद्ध महत्त्वाच्या सामन्यात चार बळी घेतले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कुलदीप यादवला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा किताब देण्यात आला. यासोबत त्याला १५,००० यूएस डॉलर्स म्हणजे सुमारे १२,४६,३५५ रुपये बक्षीस म्हणून देण्यात आले.

मोहम्मद सिराजने या सामन्यात ६ विकेट घेत श्रीलंकेच्या संघाला ५० धावांपर्यंत रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अंतिम सामन्यातील विजयी कामगिरीसाठी मोहम्मद सिराजला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. मोहम्मद सिराजला यासोबत म्हणून ५,००० डॉलर्स म्हणजे सुमारे ४,१५,४५१ रुपये बक्षीस मिळाले. महत्त्वाचं म्हणजे सिराजने हे रोख बक्षीस ग्राउंड्समनला देण्याचा मोठा निर्णय घेतला. कोलंबोमध्ये आशिया कप २०२३ दरम्यान पावसामुळे ग्राऊंड्समननी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याची आठवण आणि कौतुक म्हणून सिराजने बक्षीसाची रक्कम ग्राउंड्समनला दिली. सिराजच्या या दानशूरपणाचं खूप कौतुक होत आहे. आशियाई क्रिकेट कौन्सिलच्या वतीने, श्रीलंकेच्या मैदानी स्टाफ म्हणजेच ग्राउंड्समनला त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल बक्षीस म्हणून ५०,००० डॉलर्स रक्कम म्हणजे सुमारे ४१,५४,५१७ रुपये देण्यात आली.

## संसदेच्या विशेष अधिवेशन आजपासून सुरु होणार, कोणत्या मुद्द्यांवर चर्चा होणार?



नवी दिल्ली : संसदेच्या पाच दिवसीय अधिवेशनाला आजपासून (१८ सप्टेंबर) सुरुवात होत आहे. सरकारने याची घोषणा करताना हे 'विशेष अधिवेशन' असल्याचं म्हटलं होतं. परंतु नियमित अधिवेशन असल्याचं नंतर स्पष्ट करण्यात आलं. हे अधिवेशन सध्याच्या लोकसभेचं तेरावं आणि राज्यसभेचं २६१ वं अधिवेशन असल्याचं म्हटलं. हे अधिवेश २२ सप्टेंबरपर्यंत सुरु राहणार आहे. यादरम्यान सभागृहाचं कामकाज सकाळी ११ ते दुपारी १ मग दुपारी २ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सुरु राहिल. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे आज राज्यसभेत ७५ वर्षांचा संसदीय प्रवास, कामगिरी, अनुभव, आठवणी यावर चर्चा होणार आहे. पोस्ट ऑफिस विधेयक २०२३ आणि मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीशी संबंधित विधेयके राज्यसभेत मांडली जातील. ही दोन्ही विधेयके राज्यसभेत मांडल्यानंतर लोकसभेत मांडली जातील. लोकसभेत ॲडव्होकेट्स अमेंडमेंट बिल २०२३ आणि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पीरियडिकल बिल २०२३ सादर केले जातील. ही विधेयके ३ ऑगस्ट रोजी राज्यसभेत मंजूर झाली आहेत.

याशिवाय संसदेच्या अधिवेशनादरम्यान, G20 शिखर परिषदेचं यश, चंद्रावर चांद्रयान-३ चं सॉफ्ट लँडिंग आणि स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दलही चर्चा होऊ शकते. 'वन नेशन वन इलेक्शन' आणि देशाचे नाव 'इंडिया' वरुन 'भारत' करण्याचा प्रस्तावही या अधिवेशनात आणला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

या अधिवेशनाची सुरुवात जुन्या संसद भवनात होणार आहे. दुसऱ्या दिवशी (१९ सप्टेंबर) जुन्या संसद भवनातच फोटो सेशनचं आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी सकाळी ११ वाजता सेंट्रल हॉलमध्ये कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर खासदार नवीन संसद भवनात पोहोचतील. अधिवेशनाची बैठक १९ सप्टेंबरलाच नवीन इमारतीत होणार असून तिथे २० सप्टेंबरपासून नियमित कामकाज सुरु होणार आहे.

संविधानात विशेष अधिवेशनाचा उल्लेख नाही, परंतु महत्त्वाचे विषय आणि राष्ट्रहिताशी संबंधित घटनांशी संबंधित परिस्थितीत राष्ट्रपतींच्या आदेशानंतर सरकार विशेष अधिवेशन बोलावू शकतं. अशा अधिवेशनात प्रश्नोत्तर तास घेणं अनिवार्य नाही. आतापर्यंत सात वेळा विशेष । पान २ वर

## राज्य सरकारची ११ कलमी योजना जाहीर; पंतप्रधानांच्या वाढदिवसाची ७३ संख्या केंद्रस्थानी

छत्रपती संभाजीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शासकीय योजनांमध्ये ७३ अंक केंद्रस्थानी ठेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ११ कलमी योजनांची घोषणा केली. ७३ हजार बांधकाम मजुरांना सुरक्षा संच, तेवढीच शेततळी, सौर उर्जेचीही गावे, ७३ गावांमध्ये ग्रामपंचायत कार्यालय बांधकामापासून ते तीर्थस्थळे आणि गडकिल्ल्यांचा विकास करण्याची घोषणा पत्रकार बैठकीत केली. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

शासकीय योजनांची गाठ ७३ आकडय़ाभोवती व्हावी, अशाप्रकारे योजना जाहीर करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ७३ लाख महिलांना शासकीय योजनांचे लाभ देण्यात येतील, असे जाहीर केले. जाहीर केलेल्या सर्व योजनांमागे 'नमो' ही अक्षरे लावत योजनांची अंमलबजावणी केली जाईल, असे सांगण्यात आले

. राज्यात 'नमो आदिवासी स्मार्ट शाळा', दिव्यांग पुनर्वसन केंद्र उभारणार', नमो क्रीडा मैदाने व उद्याने उभारली जातील, असे सांगण्यात आले. शिवाय ७३ शहरांमध्ये सौंदर्यीकरणाचे प्रकल्प राबविण्याचाही निर्णय घेण्यात आला. पंतप्रधानांनी 'सबका साथ सबका विकास' कार्यक्रम हाती घेत देशाचे नाव उंचावले असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. नमो महिला सशक्तीकरण अभियानातून ४० लाख महिलांना शक्ती गटाच्या प्रवाहात जोडण्यात येणार आहे.

## मोसमी पावसाचा परतीच्या प्रवासाचा मुहूर्त यंदाही लांबणीवर

नागपूर : मोसमी पावसाच्या परतीच्या प्रवासाचा मुहूर्त यंदाही लांबणीवर जाण्याची दाट शक्यता आहे. राजस्थान, पंजाब, हरियाना, उत्तराखंड राज्यांत कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरूच असून, वायव्य भारतातून मोसमी पावसाच्या परतीसाठी अद्यापही पोषक स्थिती नाही. वायव्य भारतात पावसाने उघडीप दिल्यानंतर त्याचा परतीचा प्रवास सुरू होण्याची शक्यता आहे.

मागील वर्षी २० सप्टेंबरला मोसमी पावसाचे वारे राजस्थानातून माघारी फिरले होते. मोसमी पावसाचे आगमन आणि परतीच्या दीर्घकालीन सर्वसाधारण तारखांच्या सुधारित वेळापत्रकानुसार १७ सप्टेंबर ही त्याच्या राजस्थानातून परतीचा प्रवास सुरू करण्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. मात्र सध्या राजस्थानसह वायव्य भारतातील राज्यांत हलक्या स्वरुपात पाऊस सुरू आहे. तसेच या भागात पाऊस सुरू राहण्यासाठी पोषक प्रणाली तयार होत असल्याने मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू होण्यास आणखी उशीर होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी २० सप्टेंबरला राजस्थान आणि गुजरातमधून परतीच्या प्रवासाला सुरुवात केली.माघारी फिरल्यानंतर मोसमी पावसाच्या परतीची वाटचाल अडखळली. महाराष्ट्रातून मोसमी पावसाच्या परतीची वाटचाल सुरू होण्यास १४ ऑक्टोबरचा दिवस उजाडावा लागला. त्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी मोसमी पावसाचे वारे संपूर्ण देशातून परतल्याचे हवामान विभागाने जाहीर केले होते. यावर्षी मोसमी पावसाचे केरळमधील आगमन ८ जूनपर्यंत लांबले. तळ कोकणात ११ जूनला दाखल झालेल्या मोसमी पावसाची राज्यातील प्रगतीसाठी । पान २ वर

## महाराष्ट्र काश्मीरच्या मैत्रीचा नवा अध्याय, 'सरहद'च्या उपक्रमांना शासनाचे सहकार्य; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



श्रीनगर : काश्मीरच्या तरुणांसाठी 'सरहद' संस्था करत असलेले कार्य मोलाचे असून या तरुणांच्या प्रगतीसाठी आवश्यक असे सर्व ते पाठबळ दिले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यांनी आज येथे सांगितले. महाराष्ट्र आणि काश्मिरच्या मैत्रीचे नवे पर्व सुरू झालं असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन दिवसांच्या काश्मीर दौऱ्यावर असून पुणे येथील 'सरहद' संस्थेमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त विविधतेतील एकतेला सलाम करणाऱ्या 'हम सब एक है' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी काश्मीरशी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे दृढ ऋणानुबंध होते, याचा आवर्जून उल्लेख केला. ते म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र आणि काश्मिरच्या मैत्रीचा नवा अध्याय सुरू होत आहे. सरहद या संस्थेच्या माध्यमातून आपले जूने नाते आणखी मजबूत करण्याचा हा उपक्रम आहे. 'सरहद' संस्थेने मानवतेच्या क्षेत्रात आगळे काम केले आहे. संस्था आपत्कालीन आणि अगदी कोविडच्या संकटात धावून आली आहे. संस्थेच्या माध्यमातून पुण्यात काश्मिरी तरुणांसाठी मोठे काम उभे केले । पान २ वर


## मोदी सरकार पुन्हा आल्यास रशियासारखी हुकूमशाही येईल : पृथ्वीराज चव्हाण यांचे टीकास्त्र




कराड : लोकसभेच्या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा निवडून आल्यास चीन अणि रशियासारखी हुकूमशाही आपल्या देशातही येईल. आणि लोकांना अधिकारच राहणार नाहीत अशी भीती व्यक्त करताना, लोकशाही टिकवण्यासाठी स्वातंत्र्याची ही दुसरी लढाई जिंकायचीच असल्याचे आवाहन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.

काँग्रेसच्या जनसंवाद पदयात्रेच्या निमित्ताने कोळे (ता. कराड) येथे जाहीर सभेत ते बोलत होते. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ड. उदयसिंह पाटील-उंडाळकर, । पान २ वर

## मध्य प्रदेशात पावसाचा हाहाकार,उज्जैन आणि ओंकारेश्वरला महाराष्ट्रातील पर्यटक अडकल्याची भीती



बुलढाणा : मध्य प्रदेशातील दक्षिण भागात गेल्या ४८ तासांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे नर्मदा आणि शिप्रा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. धोक्याच्या पातळीवरुन या दोन्ही नद्या सध्या वाहत आहेत. ओंकारेश्वर जलाशयातील पाण्याचा मोठा विसर्ग ही नर्मदा नदीमध्ये सोडण्यात आला आहे. त्यामुळे नर्मदा नदीला महापूर आल्याचं पाहायला मिळतयं. तसेच या महापुरामुळे उज्जैन - इंदूर - बुऱ्हाणपूर - सोलापूर हा महामार्ग मागील २४ तासांपासून बंद ठेवण्यात आलाय. मोरटक्का येथील नर्मदा नदीच्या पुलापासून केवळ दोन फुटांच्या अंतरावर पाणी आलंय. त्यामुळे हा महामार्ग मागील २४ तासांपासून बंद आहे.

दरम्यान हा महामार्ग बंद असल्यामुळे पर्यटनासाठी गेलेले अनेक लोक मध्य प्रदेशात अडकल्याचं शक्यता वर्तवण्यात आली. तर पुढील २४ तास पाण्याचा विसर्ग सोडण्यात येणार असल्याची माहिती खांडव्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. सध्या ओंकारेश्वर आणि मोरटक्का परिसरात बचाव कार्याची मोहीम देखील राबवण्यात येतेय. मध्यप्रदेशमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे २० हून अधिक जिल्ह्यांमध्ये महापुराची स्थिती उद्भवली आहे. नर्मदा आणि शिप्रा नद्यांनी रौद्र रुप धारण केलंय. नर्मदा नदीवरील धरणांचे सात दरवाजे उघडण्यात आलेत. या पुरामुळे नदीकाठच्या गावांना । पान २ वर

## देशाचे नाव 'भारत' हेच राहिले पाहिजे; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका

पुणेः देशाचे नाव भारत हेच राहिले पाहिजे. इतर कोणत्याही देशाची दोन नावे नाहीत. भारत नावाला एक सभ्यता मूल्य आहे. भारताला प्रेरणादायी इतिहास आहे, देशाला सामाजिक आणि राजकीय परंपरा आहे. त्यामुळे देशाचे नाव भारत हेच हवे याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय समितीमध्ये चर्चा झाली. देशाचे नाव भारत हेच राहिले पाहिजे, ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका असल्याची माहिती सहसरकार्यवाह डॉ. मनमोहन वैद्य यांनी शनिवारी दिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय समितीची बैठक गेल्या तीन दिवसांपासून स. प. महाविद्यालय येथे सुरू आहे. देशभरातील ३६ संघटनांचे २६७ प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले होते. तीन दिवसांच्या बैठकीत नेमके काय घडले याची माहिती डॉ. मनमोहन वैद्य यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर या वेळी उपस्थित होते. डॉ. वैद्य म्हणाले, संघ कार्यामध्ये महिलांचा सहभाग वाढावा यासाठी विचार करण्यात आला. विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशातून विभाग स्तरावर महिला । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि.१८ सप्टेंबर २०२३ 

## ✻ सुविचार ✻

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो.

## संपादकीय

### लोकांची अपेक्षा आहे...

रस्त्यांचा दर्जा, खड्ड्यात गेलेले रस्ते हा टिंगलीचा, थट्टेचा आणि समाजमाध्यमांवर तिरकस विनोदाचा विषय झाला आहे. या मुद्द्यावरून कोणीही यावे आणि टपली मारून जावे अशी नेत्यांची गत झाली आहे. भारत देश चंद्रावर गेला. सूर्याच्या दिशेने यान पाठविले आता 'मत्स्य ६०००' ही समुद्रयान मोहीम हाती घेतली जाणार आहे. २०२४ साली बंगलाच्या सागरात याची चाचणी घेण्यात येणार आहे. तंत्रज्ञानाचा बोलबाला असलेल्या सध्याच्या काळात रस्ते खड्डेमुक्त आणि दर्जेदार बांधणे शक्य का होत नसावे की वर्षानुवर्षे रस्तेच बांधावेत अशीच सरकारांची इच्छा असावी? आयआयटी तंत्रज्ञांनी रस्त्यांची पाहणी केल्याचे वृत्त अधूनमधून प्रसिद्ध होते. तंत्रज्ञ फक्त पाहणीच करत असावेत का? उपाय सुचवत नसावेत की ते स्वीकारले जात नसावेत? ग्रामीण भागातील सुमारे तीस हजार किलोमीटरचे रस्ते चकाचक करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला आहे. त्यासाठी सुमारे तीस हजार कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे संबंधित मंत्र्यांनी सांगितले. चकाचक करणार म्हणजे नेमके काय करणार, त्यासाठी तीस हजार कोटी खर्च कसे करणार याचा खुलासा सरकार कदाचित नंतर करणार असावे. रस्ते चकाचक नसले तरी चालतील पण ते खड्डेमुक्त असावेत इतकीच लोकांची आता माफक अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे होणारी गैरसोय लोक वर्षानुवर्षे सहन करतच आले आहेत. रस्त्यांअभावी ग्रामीण भागाचा विकास खुंटतो. आजारी लोकांना रुग्णालयात नेणे शक्य होत नाही. रुग्णालयाच्या रस्त्यावरच अनेक रुग्णांना त्यांचा जीव गमवावा लागतो. खराब रस्ते हे रस्ते अपघातांचे एक प्रमुख कारण मानले जाते. अलीकडे विविध अपघातांमध्ये होत असलेले तरुणांचे मृत्यू चिंताजनकच म्हणावे लागेल. अकाली मृत्यूंचे पाप लोकांनी कोणाच्या माथी मारावे? सत्ताधारी येतात आणि जातात. त्यांचे पक्ष बदलतात. पण रस्त्यांचा दर्जा मात्र जैसे थे कसा राहात असावा? कोणी जादूगार जादू करतो की तो आर्थिक साखळीचा दुष्परिणाम असावा? सरकारने एकदाच काय तो खर्च करावा आणि फक्त ग्रामीण भागातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच रस्ते दर्जेदार बांधावेत, अशी लोकांची अपेक्षा आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ....

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने अंतर्गत जिल्ह्यातील ५४७४ लाभार्थ्यांना ४६ कोटीचा परतावा**

**✻या अंतर्गत जिल्ह्यातील विविध बँकांकडून ४४१ कोटीचे कर्ज वाटप**

जिल्ह्यात अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे कार्यालय सुरू झाल्यापासून जिल्हा कार्यालयाच्या वतीने मराठा समाजातील ५ हजार ४७४ लाभार्थ्यांना आजपर्यंत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत परतावा देण्यास सुरुवात झालेली असून त्यासाठी जवळपास ४६ कोटी परतावा म्हणून दिलेले आहेत. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील विविध बँकांनी मराठा समाजातील ५ हजार ७२५ लाभार्थ्यांना जवळपास ४४१ कोटीचे कर्ज मंजूर करून त्यांच्यातील उद्योजकाला चालना देण्याचा एक चांगला प्रयत्न केलेला असून हे सर्व लाभार्थी त्यांच्या उद्योग व्यवसायात चांगली प्रगती करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. तसेच त्यांच्या उद्योग व्यवसायामुळे इतर अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. हे या योजनेचे यश आहे.

✻वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (खठ-१):-

या योजनेची मर्यादा रुपये दहा लाखाहून पंधरा लाख पर्यंत वाढवण्यात आलेली असून महामंडळामार्फत रुपये ४.५ लाखाच्या व्याज मर्यादित परतावा करण्यात येईल सदर व्याज परतावा कालावधी जास्तीत जास्त ७ वर्षे व व्याजाचा दर जास्तीत जास्त दर साल दर शेकडा १२ टक्के इतका असेल. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी मात्र बँकेमार्फत घेतलेले कर्ज असावे व ते फक्त व्यावसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे.(टीप- मात्र दिनांक २० मे २०२२ पूर्वीच्या एल.ओ.आय. धारकांना नियमानुसार रुपये दहा लाखाच्या मर्यादेतील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरता रुपये तीन लाखाची मर्यादा असेल.)



सोलापूर जिल्ह्यात अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे कार्यालय सुरू झाल्यापासून ते आज पर्यंत १७ हजार ६८९ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. त्यातील ७ हजार ८६९ अर्जदारांना पात्रता प्रमाणपत्र(ङजख) देण्यात आलेले आहे. तर ६ हजार २५५ लाभार्थ्यांना बँकांनी कर्ज मंजूर केलेले आहे. महामंडळाकडून व्याज परतव्यासाठी मंजूर झालेल्या लाभार्थ्यांची संख्या ५ हजार ७२५ इतके असून या लाभार्थ्यांना जिल्ह्यातील विविध बँकांनी ४४१ कोटी २५ लाख ८२ हजार ७६६ कर्ज मंजूर करून लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केलेले आहे. उपरोक्त पैकी महामंडळाकडून व्याज परतावा ५ हजार ४७४ लाभार्थ्यांना सुरू झालेला असून आज पर्यंत व्याज परतव्या साठी महामंडळाने ४६ कोटी ७७ लाख ८१ हजार ४६५ रुपये लाभार्थ्यांना देण्यात आलेले आहेत.

महामंडळाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या सोलापूर जिल्हा कार्यालयाने जिल्ह्यातील मराठा समाजातील युवकांना महामंडळाच्या योजनांच्या लाभ मिळवून देऊन जास्तीत जास्त उद्योजक तयार करण्यासाठी चांगले प्रयत्न सुरू केलेले आहेत व ते जास्तीत जास्त मराठा समाजातील लोकांपर्यंत पोहोचून महामंडळ अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची माहिती देऊन त्यांना या दृष्टीने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

तरी सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील जास्तीत जास्त युवकांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊन उद्योजक बनण्यासाठी पुढे यावे असे आवाहनही महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१८ मध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ पुनर्जीवित केले. तेव्हापासून ते आज पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील जवळपास साडेपाच हजार उद्योजक निर्माण करण्यात महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाला यश आलेले आहे व ही संख्या अधिक करण्यात हे कार्यालय सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. तसेच मागील वर्षभरापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील हे संपूर्ण राज्यातील मराठा समाजातील युवकांमध्ये महामंडळाच्या मार्फत सुरू असलेल्या योजनाबाबत जागृती करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन मार्गदर्शन करत आहेत.

**सुनील सोनटक्के, जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**

## ही ऐतिहासिक तथ्ये तुमच्या माहितीची आहेत का?

इतिहासकार त्यांच्या अभ्यासाच्या द्वारे आणि संशोधनाच्या द्वारे अशी अनेक तथ्ये जगासमोर आणीत असतात, जी कधी काळी अस्तित्वात तर होती, पण त्यांचा उल्लेख कोणत्याही इतिहासाच्या पाठ्यपुस्तकामध्ये नाही. प्राचीन काळी अस्तित्वात असणाऱ्या चालीरीती, समाजव्यवस्था, तेव्हाच्या विविध प्रांतांतील लोकांच्या जीवनशैली, परंपरा आताच्या काळामध्ये आपल्याला समजाव्यात हे त्यांच्या संशोधनाचे उद्दिष्ट असते. ही तथ्ये रोचक आहेत यात शंका नाही. अशीच काहीशी अपरिचित तथ्ये खास 'माझा पेपर'च्या वाचकांसाठी.

अठराव्या शतकातील रशियाचा 'झार' पीटर द ग्रेट याची मनोरंजनाची कल्पना काहीशी विचित्र होती. त्याचे व्यक्तिमत्व अतिशय धिप्पाड होते. तब्बल सहा फुट सात इंच उंची असणाऱ्या या झारला खुज्या, बुटक्या व्यक्तींबद्दल विलक्षण आकर्षण होते. एकदा त्याने आपल्या आवडत्या खुज्याच्या विवाहासाठी शहरातील समस्त खुज्यांना पाहुण्यांचे मनोरंजन करण्यासाठी पाचारण केले. या सर्व खुज्यांना दालनाच्या मधोमध एका मोठ्या टेबलावर बसविले गेले आणि ते करीत असलेल्या नृत्यामुळे पाहुण्यांचे मनोरंजन झाले. क्वचित प्रसंगी या खुज्यांना मोठ्या केक्स मध्ये लपविल्यानंतर त्यांनी त्या विशालकाय केकमधून अचानक बाहेर मारलेल्या उड्या पाहणे हे झारचे विशेष आवडते मनोरंजन होते.

२००१च्या अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील दहशतवादी बॉम्ब हल्ल्यांच्या नंतर त्या ठिकाणचा विमानतळ तात्पुरता बंद करण्यात आला होता. त्यामुळे तिथे उतरू न शकलेली विमाने गँडर येथे उतरविण्यात आली. त्यावेळी ३८ विमाने गँडर येथे उतरली. पण येथील विमानतळ इतका मोठा नसल्याने इतक्या सर्व विमानांना जाग करून देणे हे तेथील अधिकाऱ्यांच्या समोरचे सर्वात मोठे आव्हान होते. हा विमानतळ इतक्या विमानांचा भार पेलण्यास सक्षम नसल्यामुळे काही ठिकाणी धावपट्टी धसली.

इतक्या सगळ्या विमानांमधून उतरलेल्या शेकडो प्रवाश्यांचे सामान उतरवून ते प्रवाश्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तब्बल चोवीस तासांचा अवधी लागला.

त्या शहरामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व हॉटेल्सच्या रूम्स विमानांचे वैमानिक आणि इतर कर्मचारीदलाकरीता राखीव ठेवण्यात आल्या, तर सार्वजनिक इमारती, प्रवाश्यांच्या करिता विश्रांती गृहांमध्ये परिवर्तीत करण्यात आल्या होत्या. इतकेच नव्हे, तर स्थानिक रहिवाश्यांनी देखील प्रवाश्यांसाठी आपली घरे खुली केली आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला नाकारीत पाच दिवस या आगंतुक पाहुणे मंडळींचे पुरेपूर आदरातिथ्य केले. या उपकारांची परतफेड म्हणून सर्व प्रवासी मंडळींनी गँडर मधील विद्यार्थ्यांकरिता स्कॉलरशिप फंड जमा करून स्थानिक प्रशासनाकडे सुपूर्त केला.एकोणिसाव्या शतकामध्ये ओपियम (अफू) निरनिरळ्या आजारांवर उपचार करण्यासाठी राजरोस वापरली जात असे. अफूच्या सढळ हस्ते होणाऱ्या वापरामुळे पुष्कळ लोकांना अफूची नशा करण्याचे व्यसन जडत असे. हे व्यसन एकदा जडले, की मग त्यापासून सुटका करून घेणे सहज शक्य होत नसे. डोकेदुखी, डायरिया, अस्थमा, पोटांचे इतर विकार इथपासून ते महिलांना मासिक पाळीमध्ये होणाऱ्या पोटदुखी साठी देखील अफू औषध म्हणून दिली जात असे.

हायपोडर्मिक सिरींजचा वापर करून ओपीयम इंजेक्ट केले जात असल्याने याचा परिणाम लवकर होत असे. अमेरिकन क्रांतीच्या वेळी जखमी सैनिकांसाठी देखील वेदनाशामक म्हणून ओपियमचा वापर केला जात असे. १८९५ सालापर्यंत ओपियमचे व्यसन असलेल्यांची संख्या हाताबाहेर गेली. यामध्ये सुमारे साठ टक्के प्रमाण महिलांचे होते. १८७० नंतर या व्यसनाविरोधात जनजागृती केली जाऊ लागली.

पान १ वरुन

### संसदेच्या विशेष अधिवेशन ..

अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. यामध्ये पहिलं विशेष अधिवेशन १९७७, दुसरं १९९१, तिसरं १९९२, चौथं १९९७, पाचवं २००८, सहावं २०१५ आणि सातवं २०१७ मध्ये बोलावण्यात आलं होतं.

विशेष अधिवेशन बोलावण्यावरुन अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. कारण संसदेत सामान्यत: तीन अधिवेशन आयोजित केली जातात, ज्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन, पावसाळी अधिवेशन आणि हिवाळी अधिवेशन यांचा समावेश असतो. यंदा जुलै-ऑगस्टमध्ये पावसाळी अधिवेशन झालं. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये हिवाळी अधिवेशन होणार आहे. दरवर्षी जानेवारीच्या अखेरीस किंवा फेब्रुवारीच्या सुरुवातीला अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होतं. तसंच दोन अधिवेशनांमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त अंतर असू शकत नाही. दरम्यान भाजप आणि काँग्रेसने यापूर्वीच आपापल्या खासदारांना संसदेच्या अधिवेशनात उपस्थित राहण्यासाठी व्हिप जारी केला आहे. काँग्रेसने आपल्या खासदारांना १८ ते २२ सप्टेंबर या संसदेच्या अधिवेशनात उपस्थित राहून पक्षाच्या भूमिकेला पाठिंबा देण्यास सांगितलं होतं. त्याचवेळी भाजपनेही व्हिप जारी करुन आपल्या खासदारांना महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा करण्यास आणि सरकारच्या भूमिकेला पाठिंबा देण्यास सांगितलं होतं.

दरम्यान संसदेच्या विशेष अधिवेशनापूर्वी रविवारी (१७ सप्टेंबर) सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत अनेक विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले होते. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुख अब्दुल्ला, द्रमुक नेते वायको, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) नेते व्ही शिवदासन हे बैठकीत सहभागी झाले होते. संसदेच्या पाच दिवसीय अधिवेशनात रविवारी झालेल्या या बैठकीत अनेक सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्याची भूमिका मांडली.

### महाराष्ट्र काश्मीरच्या मैत्रीचा नवा ..

आहे. त्यांच्या शिक्षणासाठी, महत्वपूर्ण काम केले आहे. त्यांच्या शिक्षणातील आरक्षणासाठी वंदनीय बाळासाहेबांनी पाठिंबा दिला होता. ज्या- ज्यावेळी काश्मीरला आलो त्यावेळी येथील बांधवानी आपल्यावर भरभरून प्रेम केलं. काश्मीरला निसर्गाचे अपूर्व वरदान लाभले आहे. महाराष्ट्र आणि काश्मीर दोन्ही राज्यांत पर्यटनाच्या अमर्याद संधी असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी पनवेल येथे काश्मीर नागरिकांसाठी दिलेल्या जमिनीच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य देण्यात येईल अशी ग्वाही दिली. तसेच काश्मीरमध्ये महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी नायब राज्यपाल सिन्हा यांनी तत्काळ प्रतिसाद दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'नमो ११ कलमी कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच जी-२० च्या निमित्ताने भारताकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले. यात काश्मीरसह अनेक राज्यांना आपले वेगळेपण सिद्ध करण्याची संधी आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्याचे ते म्हणाले.

यावेळी नायब राज्यपाल सिन्हा यांनी मुख्यमंत्रीशिंदे यांना तत्काळ प्रतिसाद दिला. आपण येत्या नवरात्रोत्सवात काश्मीर दौऱ्यावर याल त्यावेळी या महाराष्ट्र भवनाच्या इमारतीचे भूमिपूजन केले जाईल. त्यासाठी आपल्याला जाहीर निमंत्रण देत असल्याचे त्यांनी सांगितले.

### मोदी सरकार पुन्हा आल्यास..

युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष शिवराज मोरे, मलकापूरच्या नगराध्यक्ष निलम येडगे, नामदेव पाटील, कोळेच्या सरपंच भाग्यश्री देसाई आदींची प्रमुख उपस्थिती होती. केंद्र अणि राज्यासमोर काय प्रश्न आहेत, हे सामान्य जनतेला कळले पाहीजेत म्हणूनच भारत जोडोनंतर जनसंवाद पदयात्रा काढली आहे. असे सांगून, चव्हाण यांनी पंतप्रधान मोदींच्या नऊ वर्षाच्या काळातील कर्जाच्या प्रचंड बोज्यातून देश वाचणार अशी चिंता व्यक्त केली.

केंद्रातील एकहाती, हुकुमशाही व मनमानी वर्चस्वाला कर्नाटकात दारूण पराभव मिळाला. त्या सत्तेला दक्षिणेतील राज्ये आता साथ देणार नाहीत. हे लक्षात आल्यानंतर भाजपने महाराष्ट्रात कारस्थान करून, शिवसेना त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसही फोडली. त्यांचे गद्दारीचे राजकारण सामान्य लक्षात आल्याने सामान्य जनता आता त्यांना साथ देणार नाही. स्वतःचा स्वाभिमान विकून मतदान करणार नाही असे भावनिक प्रतिपादन चव्हाण यांनी केले. खाजगी करणाकडे तब्बल सात हजार शाळांची वाटचाल सुरू आहे. गॅस, तेलाच्या किंमती प्रचंड वाढल्या आहेत. नोकर भरती नाही, कर्मचाऱ्यांच्या पगारलाही पैसे नाहीत. ठेकेदारी पध्दतीवर नोकऱ्या दिल्या जात आहेत. मोदींनी फक्त तेलावर कर लादून तीस लाख कोटी गोळा केल्याची टीका चव्हाण यांनी केली. ड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांनी भाजपवर जोरदार टीका करताना, काँग्रेसच्या जनसंवाद पदयात्रेची भूमिका मांडली.

### मध्य प्रदेशात पावसाचा हाहाकार..

देखील मोठा फटका बसल्याचं चित्र आहे. तसेच इंदूर, नर्मदापुरम, रतलाम, उज्जैनमध्ये मुसळधार पावसामुळे शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आलीये. ओंकारेश्वरमध्ये धरणाचे २२ दरवाजे उघडण्यात आलेत. त्यामुळे जबलपूर, नरसिंहपुर, रायसेन, नर्मदापुरम, खंडवा जिल्ह्यांतील गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. मध्य प्रदेशातील आठ जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. तर सध्या उज्जैनमधील अनेक मंदिरं आणि घाट पाण्याखाली गेल्याचं पाहायला मिळतय. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पुरामुळे प्रभावित झालेल्या जिल्ह्यांमध्ये तात्काळ मदत पोहचवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच यामध्ये आतापर्यंत ८७१८ नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. तर एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे अनेक जवान सध्या पुरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाटी पोहचले आहेत.

### देशाचे नाव 'भारत' हेच राहिले..

संमेलनांचे आयोजन करण्यात येत आहे. महिला संपर्काच्या माध्यमातून ऑगस्टपासून जानेवारीपर्यंत देशात ४११ महिला संमेलनांचे आयोजन करण्यात येणार आहे. आतापर्यंत १२ प्रांतांमध्ये ७३ ठिकाणी महिला संमेलन झाले असून त्यामध्ये एक लाख २३ हजार महिला सहभागी झाल्या आहेत. संघ संपर्कात येणाऱ्या नव्या लोकांना संघाचे काम समजण्यासाठी संघ परिचय वर्ग घेतले जातील. संघ कार्य वाढत असून समाजाचा संघाच्या कार्यामध्ये सहभाग वाढत आहे. संघ समाजात सांस्कृतिक काम करत आहे. देश विरोधी शक्ती कमी होत असून देशाला पुढे नेणाऱ्या शक्तीचे काम वाढत आहे. मणिपूरमध्ये झालेला हिंसाचार आणि तेथील अशांत परिस्थिती यावर चर्चा करण्यात आली. ही स्थिती चिंताजनक असून यामध्ये तेथील सरकारने निर्णय घेणे अपेक्षित असल्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. दोन समाजातील वाद मिटवण्यासाठी संघ कार्यकर्ते काम करत आहेत, याकडे वैद्य यांनी लक्ष वेधले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना अनेक वर्ष समाजाने बाजूला ठेवले आहे. त्यांना आरक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जावे ही संघाची भूमिका असल्याचे वैद्य यांनी स्पष्ट केले. अयोध्या येथील श्रीराम मंदिरामध्ये प्राणप्रतिष्ठापना जानेवारीत मकर संक्रांतीनंतर मुहूर्तावर करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

### मोसमी पावसाचा परतीच्या ..

वाट पाहावी लागली. २३ जूनला राज्यातील पुढील वाटचाल सुरू केलेल्या वाऱ्यांनी दोनच दिवसांत संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. त्यानंतर नियमित सर्वसाधारण वेळेच्या ६ दिवस आधीच म्हणजेच २ जुलैला मोसमी पाऊस संपूर्ण देशभरात पोहोचला होता.

वायव्य भारतात पावसाने सलग पाच दिवस उघडीप देणे. आर्द्रतेची टक्केवारी कमी होऊन कोरडे हवामान होणे, वाऱ्यांची दिशा बदलण्याबरोबरच परिसरावर घड्याळाच्या काट्याच्या दिशेने केंद्रभागातून बाहेरच्या बाजूला वारे वाहणारी क्षेत्रे (ण्टी सायक्लोन) तयार होणे आवश्यक असते. त्यानंतरच या भागातून मॉन्सून परतल्याचे जाहीर करण्यात येते.

## मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करताय? सावधान !

सध्याच्या काळामध्ये अन्न गरम करण्याकरिता बहुतेक स्वयंपाकघरांमध्ये मायक्रोवेव्हचा वापर करण्याचे प्रमाण वाढले आहे. आणि वाढणार का नाही ? मायक्रोवेव्ह सारखे कमालीचे उतपादन आपल्या मदतीला असताना अन्न झटपट गरम होते, वेळ वाचतो आणि गॅसची ही बचत होते. शिवाय गरम होत असलेल्या अन्नावर लक्ष ठेवावे लागत नाही. मायक्रोवेव्ह मध्ये वेळ सेट केली की मायक्रोवेव्ह आपले काम पूर्ण करून आपोआप बंदही होऊन जातो. अगदी भाज्या तयार करण्यापासून ते टीव्हीवर सिनेमा बघताना तोंडात टाकण्यासाठी पॉपकॉर्न पर्यंत सर्व काही मायक्रोवेव्ह मध्ये अगदी काही सेकंदांच्या अवधीत तयार होते. पण स्विस शास्त्रज्ञ हान्स हार्टल यांनी केलेल्या संशोधनानुसार मायक्रोवेव्ह मध्ये अन्न गरम केल्याने त्यामधील पोषक तत्वे नष्ट होतात. मायक्रोवेव्ह मध्ये तीव्र रेडीयेशनच्या मदतीने अन्न गरम केले जात असल्याने अन्नामधील रासायनिक आणि आण्विक संबंध नष्ट होऊन त्यांच्या जागी घाक रेडियोॲक्टीव्ह कंपाऊंड अन्नामध्ये तयार होतात.शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार मायक्रोवेव्ह मध्ये गरम केलेल्या अन्नाचे सतत सेवन करण्याने शरीरातील रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. त्यामुळे शरीरामध्ये वारंवार कसले न कसले विकार, इन्फेक्शन उद्भवू लागतात. त्यामुळे अन्न गरम करण्यासाठी मायक्रोवेव्हचा वापर करायचाच असेल, तर त्यासाठी काही गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे. सर्वप्रथम हे लक्षात घ्या, की अन्न कमी काळाकरिता मायक्रोवेव्ह मध्ये गरम करा, पण अन्न पूर्णपणे मायक्रोवेव्ह मध्ये शिजवू नका. तसेह अन्न गरम करीत असताना अधून मधून चमच्याने ढवळा. या मुळे उष्णता सर्व अन्नामध्ये एकसारखी विभागली जाईल. मायक्रोवेव्ह मध्ये अन्न गरम करण्याकरिता शक्यतो काचेची भांडी वापरा. पुष्कळ लोक मायक्रोवेव्ह साठी प्लास्टिकची भांडी वापरतात. पण सर्वच प्लास्टिक मायक्रोवेव्ह मध्ये वापरणे योग्य नाही. हलक्या प्रतीच्या प्लास्टिकच्या भांड्यामध्ये अन्न ठेऊन ते मायक्रोवेव्ह मध्ये गरम करणे धोकादायक ठरू शकते. मायक्रोवेव्ह मध्ये वापरण्यासाठी खास प्रकारच्या प्लास्टिक च्या भांड्यांचा वापर करा. अश्या भांड्यांवर, ती ' मायक्रोवेव्ह सेफ ' असल्याबद्दलची सूचना असते. तसेच काचेची भांडी वापरताना त्यावर कोणत्याही प्रकारची सोनेरी, चंदेरी नक्षी असेल, तर ती भांडी वापरू नयेत. प्रत्येक अन्नपदार्थ किती गरम करायचा या बद्दलच्या सविस्तर सूचना प्रत्येक मायक्रोवेव्हच्या ' युजर मॅन्युअल ' मध्ये दिलेल्या असतात. तय सूचनांचे पालन करावे. एखादा द्रव पदार्थ मायक्रोवेव्ह मध्ये गरम करताना त्यावर लक्ष ठेवावे. ठ

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कु.प्रणिता सुरवसे हीचा सोलापूर येथे वीर कोतवाल संस्थेच्या वतीने सत्कार



सोलापूर/प्रतिनिधीः निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर. येथे वीर कोतवाल शिक्षण संस्था, सोलापूर. यांच्या वतीने नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच उल्लेखनीय कार्य करून विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वागदरीचे नाभिक टायगर सेना अक्कलकोट तालुका अध्यक्ष संजय सुरवसे यांची कन्या श्री एस. एस शेळके प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय,वागदरी येथे इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत शिकत असलेले नाभिक कन्या कुमारी प्रणिता संजय सुरवसे हिने तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत १९वर्षे वयोगटामध्ये उंच उडी या क्रीडा स्पर्धेत अक्कलकोट तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावले. त्याबद्दल सन्मानचिन्ह, आणि सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच इयत्ता दहावी ७४ टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल गुणवंत विद्यार्थी हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी वीर कोतवाल संस्थेचे सर्व मान्यवर, प्रमुख अतिथी विर कोतवाल शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. मान्यवराच्या शुभ हस्ते सर्वांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील नाभिक समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# हरळय्यावस्ती शाळेचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मण सदरखेड यांना जनकल्याण पुरस्काराने सन्मानित



सोलापूर/प्रतिनिधीः हत्तरसंग कुडल येथील श्री संगमेश्वर मंदिर परिसर सभागृह येथे जनकल्याण मलिस्टेट को - ऑफ क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर व ड्रीम फौंडेशन चे बसव संगम शेतकरी गट आयोजित कार्यक्रमात कार्यकारी अभियंता मा श्री संजय धनशेट्टी यांच्या शुभहस्ते कल्लकर्जाळ येथील हरळय्यावस्ती जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मण सदरखेड यांना जनकल्याण राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले... यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. लालासाहेब तांबडे वरिष्ठ वैज्ञानिक कृषी विज्ञान केंद्र , श्री संगप्पा केरके ,शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री वीरभद्र यादवाड सर, जनकल्याण मल्टिस्टेटचे संस्थापक श्री राजेंद्र हजारे व ड्रीम फाऊंडेशन चे सर्वेसर्वा काशिनाथ भतगुनकी, श्री प्रकाश विजापूरे , श्री अप्पाशा कोडते , श्री धर्मांना ईश्र्वरकट्टी, देवराया सदरखेड आदी मान्यवर उपस्थित होते.

# युवक काँग्रेसने साजरा केला पंढरपुरात बेरोजगार दिवस

## शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली युवक शहराध्यक्ष संदिप शिंदे यांचे आंदोलन

पंढरपूर/प्रतिनिधीः विद्यमान भाजप सरकारचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने दरवर्षी २ कोटी युवकांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले पण त्यांनी रोजगार देणे सोडा आहे ते रोजगार युवकांच्या हातातून काढून घेण्याचे काम केलेले आहे. जीएसटी व नोटा बंदीच्या निर्णयामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवकांसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांनी दिलेल्या आश्वासनाची आठवण त्यांना यावी म्हणूनच बेरोजगार दिवस साजरा करत युवक काँग्रेसने पंढरपूरात अनोखे आंदोलन करत नागरिकांचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला.

सदरचे आंदोलन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे साहेब, प्रदेशाध्यक्ष आ.नानासाहेब पटोले, प्रदेश कार्याध्यक्षा आ.प्रणितीताई शिंदे, युवक प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाशतात्या पाटील, महिला नेत्या सुनेत्राताई पवार, युवक जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसचे पंढरपूर शहराध्यक्ष संदिप शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात अनोखे आंदोलन करत भाजप सरकारच्या धोरणांचा निषेध केला.यावेळी भाजप सरकारने १० वर्षात दिले काय लॉलीपॉप लॉलीपॉप, भाजप हटाव देश बचाव, महागाईच्या जमान्यात स्वस्तातील १ रूपयात चहा विकून बेरोजगारी कमी केली, मोदी तेरे राज युवा गये जेल में, बेरोजगार बोले हॅलो हॅलो मोदी बोले भजीया तलो अशा काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.



यावेळी माजी नगरसेवक किरणराज घाडगे, जिल्हा उपाध्यक्ष सुहास भाळवणकर, जिल्हा सचिव राजू उराडे, सेवा दल अध्यक्ष गणेश माने, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष अश्पाक सय्यद, वरिष्ठ शहर उपाध्यक्ष नागनाथ अधटराव, मिलिंद अढवळकर, देवानंद इरकल, राजेंद्र गोळे, शशिकांत चंदनशिवे, शिवकुमार भावलेकर, संतोष हाके, द.बडवे, महेश अधटराव, बाळासाहेब लोकरे यांच्यासह काँग्रेसच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त नळदुर्ग भरगच्च कार्यक्रम

## विद्यार्थांच्या प्रभात फेरी द्वारे मराठवाडा मुक्ती संग्रामाची जनजागृती



नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग सारख्या ऐतिहासिक शहरात अनेक मोठ मोठ्या घटना घडल्या आजाव्यात त्यामधील एक घटना म्हणजे नळदुर्ग शहरातील रोज कबाड कष्ठ करून आपल्या कुटुंबांचा उदरनिर्वाह करीत आसताना रजाकारानी या देशात दहशत माजवली आणी भारतात हैद्राबाद संस्थान हे भारतात विलीन करायचे होते परंतू निजाम संस्थान भारतात विलीन झाले नाही खुप मोठा संग्राम करावा लागला मराठवाडा मुक्ती संग्राम साठी मराठवाडयातील अनेक विर समोर आले यामध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामात हुतात्माती खुप मोठी भुमीका बजावली

आपला देश स्वतंत्र्य झाला पण देशातील काही संस्थानिक स्वतंत्र्यामध्ये विलीन होण्यास तयार नव्हते यात हैद्राबादचे निजाम संस्थान याच संस्थानात मराठवाडयातील सात ही जिल्हे निजाम संस्थानात होते निजाम संस्थानां मधून मराठवाड्यातील सात जिल्हे बाहेर काढून भारत देश स्वातंत्र्यात विलीनीकरण करण करण्या करिता झालेला हैदराबाद मुक्तिसंग्राम या संग्रामात अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन तर कोणी या स्वातंत्र्याच्या लढाई मध्ये सक्रिय सहभाग नोंदविला जीव मुठीत धरून रजाकारा विरुद्ध जिद्दीने लढा दिला

ही लढाई जिंकली हा इतिहास जिवंत ठेवावा नळदुर्ग शहराचे ऐतिहासिक महत्त्व कळावे म्हणून माजी नगरसेवक विनायक अहंकारी व भिमाशंकर बताले यानी गेली १ महिना भर नळदुर्ग हुतात्मा स्मारक मध्ये दररोज विविध राजकीय शासकीय सामाजिक धार्मिक क्षेत्रातील नामावंत नागरीकाना बोलावुन घेऊन हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले याच बरोबर देशासाठी बलिदान देऊन स्वराज्याचा पाया छातीवर घेत देश आबाधीत ठेवला त्या किर्ती विर यशवंत बनसोडे यांच्या मातोश्री आणी स्वतंत्र्य सैनिकांचे वारसदार आदिंचा खुप मोठ्या प्रमाणात सत्कार करण्यात आला .

यावेळी नळदुर्ग ऐतिहासिक किल्यावर नायब तहसिलदार यांच्या हस्ते तिरंगा ध्वजारोहण करण्यात आले प्राचीन पुलाचे पुजन करून बचित्तरसिह यांच्या प्रतिमेच पुजन करून अभिवादन करण्यात आले . यावेळी भारत माता की जय आशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या

यावेळी नळदुर्ग येथील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक रियाज पटेल व त्यांच्या सहकार्यानी तिरंगा ध्वजास मानवंदना दिली.हा सर्व कार्यक्रम आयोजित केला नळदुर्ग नगरीचे माजी नगर सेवक विनायक अंहकारी यानी नळदुर्ग शहराचा उल्लेख भारतात व्हावा नळदुर्ग शहराचा इतिहास सर्वाना कळावा म्हणून हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .

यावेळी उस्मानाबाद चे जिल्हाधिकारी डॉ सचिन ओम्बासे यानी जे स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांच्या घरावर डिजीटल बोर्ड लाऊन त्यांचा इतिहास जिवंत ठेवण्याचा आणी त्यांचा सन्मान करण्यासारखा बोर्ड तयार करून दिला आणी तो बोर्ड घरावरती लावण्यात आला . यावेळी नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे नय्यर जाहागीरदार , बसवराज धरणे, कमलाकर चव्हाण , पत्रकार विलास येडगे , सुहास येडगे , सुधिर हजारे , हुतात्मा पुत्र देवानंद बनसोडे , नितीन कासार , संजय बताले , शिवाजीराव मोरे , अमर भाळे , संजय जाधव , उत्तम बनजगोळे , मंडल अधिकारी जयंत गायकवाड सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना शुभारंभाच्या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम

## पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचा लाभ ३० लाख कारागिरांना होणार : पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील

पुणे : पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या माध्यमातून ३० लाख कारागिरांना लाभ होणार आहे. ही योजना १३ हजार कोटींची असून योजनेमुळे देशातील कारागिराच्या आर्थिक उन्नतीसोबत त्याच्या परंपरागत कौशल्याची जपणूकही होणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमाचे अण्णाभाऊ साठे सभागृहात थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, पीएम विश्वकर्मा योजना सर्वसामान्य कारागिरांसाठी आहे. देशातील कारागिरांचे कौशल्य टिकावे आणि त्यातून त्याच्या आर्थिक उन्नतीला चालना मिळावी असा प्रयत्न आहे. त्यासाठी त्याला ५ टक्के व्याजदराने कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

त्यासोबत कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देण्यात येणार असून दररोज ५०० रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाचे प्रमाणत्र देण्यात येणार आहे. उत्पादित वस्तूंना बाजार मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाच्या उन्नतीसाठी विविध योजना राबवितांना सर्वसामान्य माणसाला सहभागी करून घेतले. ३२ कोटी नागरिकांचे जनधन खाते सुरू झाले आहेत. नागरिकांच्या सहभागातून देशात स्वच्छतेची चळवळ मोठ्या प्रमाणात राबविण्यात आली.

कोविड काळात ८० कोटी गरिबांना मोफत धान्य देण्यात आले, असेही पालकमंत्री म्हणाले. पीएम विश्वकर्मा योजनेचा कारागिरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार मिसाळ म्हणाल्या, पीएम विश्वकर्मा योजना ही सामान्य कारागिरांसाठी योजना आहे. या योजनेअंतर्गत कारागिरांना कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यांना आवश्यक साधने देण्यात येणार आहेत. कारागिरांसाठी पुरस्कारही देण्यात येणार आहेत. ही योजना तळागाळापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार तापकीर म्हणाले, जनधन योजना, उज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शेतकरी सन्मान निधी योजना अशा अनेक कल्याणकारी योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आल्या आहेत.

देशात पायाभूत सुविधांचा विकासही मोठ्या प्रमाणात होत असून मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रशिक्षण, व्यवसायासाठी १५ हजारापर्यंत साहित्य आणि कर्ज सुविधा देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# ई-फायलिंग प्रणालीमुळे होणार खर्चाची आणि वेळेची बचत : न्यायाधीश एम.एस.आझमी

## पंढरपूर न्यायालयामध्ये ई-फायलिंगच्या स्वतंत्र कक्षाचे उद्घाटन

पंढरपूर/प्रतिनिधीः ई- फायलिंग प्रणालीच्या माध्यमातुन विधीज्ञ किंवा पक्षकार यांना न्यायालयात न येता दिवाणी आणि इतर न्यायिक प्रकरणे दाखल करता येणार आहे. यामुळे पक्षकार, विधीज्ञ यांच्या वेळेची आणि खर्चाची बचत होणार असल्याचे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी केले.जिल्हा न्यायालय पंढरपूर येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या उपस्थितीत ई-फायलिंग कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र अॅड. गोवा चेअरमन ड.मिलिंद एस. थोबडे, पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष अर्जुन पाटील, उपाध्यक्ष ड .शशिकांत घाडगे, सचिव ड.राहुल बोडके, प्रबंधक सौ. पी. पी. पैठणकर, अधिक्षक आर. एस. बेंबळकर, अधिक्षक श्री. चुंगे, सहा. अधिक्षक एस. एस. शिंदे, कुलकर्णी तसेच विधीज्ञ, पक्षकार व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी म्हणाले, ई-फायलिंग प्रणाली ही उत्तम आहे. मात्र अनेकांना अद्याप खटले, दावे ऑनलाईन कसे दाखल करावयाचे, हे समजत नाही त्यामुळे ई-फायलिंग प्रणालीचा वापर करताना अनेक अडचणी येत आहेत. ही अडचण दूर करण्यासाठी प्रत्येक न्यायालयामध्ये ई-फायलिंगसाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यामधुन कागदविरहित कामकाज होते, सातत्याने फाईल जवळ बाळगण्याची गरज नाही तसेच ई-फायलिंग पोर्टल मोबाईल, टॅबलेट यावरही वापरु शकता असेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी पंढरपूर न्यायालयातील न्यायिक अधिकारी यांना मार्गदर्शन केले. तसेच येथे तयार होत असलेल्या ई-सेवा केंद्रास भेट देवुन अंतिम टप्पयात असलेल्या कामाचा आढावा घेतला.

यावेळी पंढरपूर न्यायालयातील तयार होत असलेले ई-सेवा केंद्र प्रशस्त असलेबाबतचे गौरवोद्गार काढले. तद्नंतर पंढरपूर अधिवक्ता संघाच्या कार्यालयात भेट देवुन तरुण विधीज्ञांना ई-फायलिंगच्या मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल माहिती दिली.

# आ.बबनदादा शिंदे यांच्या उपस्थितीत पुनर्वसन गावांच्या प्रलंबित प्रश्नासाठी बैठक

टेंभुर्णी/प्रतिनिधी : माढा मतदारसंघात समाविष्ट माढा, पंढरपूर तालुक्यातील पुनर्वसन गावांच्या प्रलंबित प्रश्नासाठी चिंचणी ता.पंढरपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकीला माढा विधानसभेचे आमदार बबनदादा शिंदे उपस्थित राहून पुनर्वसन गावांसाठी नागरी सुविधा करणे, महसूल गाव करणे, ग्रामपंचायत स्थापन करणे, नागरी सुविधा हस्तांतरण करणे, नवीन शर्त शेरा कमी करणे, गावठाण मोजणी करणे, वहिवाट अडथळा दूर करणे, अपूर्ण विद्युतीकरण पूर्ण करणे, बेकायदेशीर भूखंड वाटप रद्द करणे अशा विविध प्रश्नांवर अधिकाऱ्यांशी आ. शिंदे यांनी चर्चा केली.या सर्व मागण्या पूर्ण करण्याची मागणी या आ. शिंदे यांनी बैठकीत केली. प्रसंगी यावर सकारात्मक प्रतिसाद देत प्रलंबित सर्व प्रस्ताव निकाली काढून तात्काळ कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी दिले. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा परिषद सदस्य रणजीतसिंह शिंदे, प्रांत अधिकारी प्रियांका आंबेकर, प्रांत अधिकारी गजानन गुरव, माढा तहसीलदार विनोर रणवरे, पंढरपूर तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अप्पर तहसीलदार तुषार शिंदे, माढा बी.डी.ओ. महेश सुळे, पंढरपूर बी.डी.ओ काळे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी टोंपे, जि.प.सदस्य अतुल खरात, पोपट मामा चव्हाण, महावितरण कार्यकारी अभियंता विजय पाटील, बी.डी.ओ. प्रशांत काळे,




महेश पाटील, संतोष सोनवणे, दिलीप शिंदे, पूजा अवताडे, जी.आर सोनार, व्ही.व्ही. मोरे, लक्ष्मण तात्या धनवडे, मोहनराव अनपट, पुनर्वसन गावचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य तसेच विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे शालेय शहरस्तर वुशु स्पर्धा संपन्न

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर महानगरपालिका सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व वुशु असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय शहरस्तर वुशु स्पर्धा २०२३ घेण्यात आले दि. १६ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे आयोजित करण्यात आले होते त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष युवराज गायकवाड ,प्रमुख पाहुणे सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी मा. श्रीकांत घोलप , वुशु असोसिएशन चे शहर अध्यक्ष किशोर चंदनशिवे,उपाध्यक्ष भास्कर देडे, डॉ संभाजी मस्के, व्यवस्थापक मा.अभिजीत गायकवाड,पंच महादेव शेरीकर,पंच अतुल राठोड आदी मान्यवर क्रीडा शिक्षक, कोच उपस्थितीत होते सदर स्पर्धेत भारती विद्यापीठ शाळेतील साक्षी शिंदे प्रथम शालेय शहर वुशु स्पर्धेत भारती विद्यापीठ शाळेतील व माशाळे नगर कराटे क्लास मधील साक्षी शिंदे हिने प्रथम क्रमांक पटकाविला व तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली तिला प्रशिक्षक अभिजीत गायकवाड सर, क्रीडा शिक्षक सावंत सर, ग्रँड मास्टर युवराज गायकवाड सर यांचे मार्गदर्शन लाभले



# सावरकर विद्यालयात शाडू माती गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न



निफाड/प्रतिनिधीः म वि प्र संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे विज्ञान छंद मंडळ, कला समिती व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कदम यु के , यांच्या संकल्पनेतून पर्यावरण पूरक शाडू माती गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी विद्यालयातील कलाशिक्षक गौतम जाधव व गायत्री जाधव यांच्या मार्गदर्शनातून शाडू माती पासून पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची निर्मिती करण्यात आली. यावेळी विज्ञान शिक्षिका श्रीमती सुरेखा झोमन यांनी पर्यावरणाचा समतोल राखून आपण आपले सण व उत्सव साजरे केले पाहिजे, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या वापरामुळे होणारे पाण्याचे प्रदूषण याची जाणीव विद्यार्थ्यांना संदेश दिला. या कार्यशाळेतून निवडल्या गेलेल्या प्रथम क्रमांकाच्या गणेश मूर्तीची स्थापना विद्यालयातील गणेश उत्सवात करण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून नंदिनी गावले व प्रियांका खरात यांनी कामकाज पाहिले..शाडूची माती उपलब्ध करून देण्याचे काम नितीन सावकार यांनी केले. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी विज्ञान छंद मंडळ समिती प्रमुख रोशन दवते, कला समिती प्रमुख गौतम जाधव व सांस्कृतिक समिती प्रमुख सुधाकर निकम यांनी परिश्रम घेतले.

# शरीरात आत्मा येतो: अनिसचे प्रबोधन

सोलापूर/प्रतिनिधी : विवेकानंद नगर, हत्तुर वस्ती, होटगी रोड विमानतळ जवळ, सोलापूर येथे एका महिलेच्या अंगात येते. एक वर्षापूर्वी वारलेले रवींद्र पाटील यांचा आत्मा त्या महिलेच्या अंगात येऊन संवाद साधतो अशी माहिती परिसरात पसरली. तसेच पाटील कुटुंबीयांच्या अंगणात कुंकू लावून कापलेला लिंबू कोणीतरी टाकला. मयत व्यक्तीची पत्नी मीरा पाटील, मुलगी वैष्णवी पाटील, मुलगा वैभव पाटील हे कुटुंब सदर घटनेने अस्वस्थ झाले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेस सदर घटनेची माहिती मिळताच कार्यकर्त्यांनी घटनास्थळास जाऊन भेट दिली. पाटील कुटुंब व आत्मा येणाऱ्या बाईचे त्यांनी समुपदेशन करून सर्वांचे प्रबोधन केले

पाटील कुटुंब गेल्या नऊ वर्षापासून तेथे राहत असून या कुटुंबा संदर्भात सर्व माहिती अंगात आत्मा येणाऱ्या बाईस होती. तिच्या सांगण्यानुसार मयत रवींद्र पाटील यांचा आत्मा तिच्या शरीरात येऊन संवाद साधत असे. ही बातमी परिसरात सगळीकडे पसरतात पाटील कुटुंबीय अस्वस्थ झाले. त्यांचे नातेवाईक सचिन कर्दळकर, दिपाली कर्दळकर, उषा कर्दळकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी यासंदर्भात संपर्क केला असता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेच्या कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर, प्रधान सचिव ब्रह्मानंद धडके, राज्य कार्यकारिणी सदस्य उषा शहा यांनी पाटील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे व त्यांच्या शेजाऱ्यांचे समुपदेशन व प्रबोधन केले. तसेच ज्या बाईच्या अंगात येते त्या महिलेच्या घरी जाऊनही सदर महिलेचेहि त्यांनी समुपदेशन व प्रबोधन केले. सर्वांशी चर्चेअंती आत्मा अस्तित्वात नसतो आणि तो असा कोणाच्याही अंगात येऊन संवाद साधत नाही यावर सर्वांचे एकमत झाले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते सतत अशा विविध प्रकारच्या अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्यासाठी सक्रियपणे कार्य करीत असतात असे उपस्थित नागरिकांकडून सांगण्यात आले.



# संतोष पाटील यांची बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये निवड



वडगोल/नामदेव निर्मळे : वडगोल तालुका चिकोडी जिल्हा बेळगाव कर्नाटक येथील येथील सुपुत्र मा. संतोष दरीगोंडा पाटील यांची बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये निवड घरची अतिशय गरीबी परिस्थिती वडील शेती करतात. यांची निवड झाल्यामुळे सर्वत्र यांचे कौतुक होत आहे. शिक्षण बी. कॉम झाले आहे. बेळगाव येथे त्यांची परीक्षा व फिजिकल पार पडले. व मेडिकल बेंगलोर या ठिकाणी झाले. वयाच्या २३ व्या वर्षी हे भारतीय सेनेमध्ये दाखल होणार आहेत. यांचे ट्रेनिंग झारखंड येथे २७ ऑक्टोबर पासून सुरुवात होणार आहे.यांचे शिक्षण पहिली ते आठवी गावात झाले. त्यानंतर नववी ते बारावी एक्संबा व डिग्री व बी कॉम सदलगा येथे पूर्ण केले. सर्वत्र यांचे कौतुक होत असून अनेक लोकप्रतिनिधी यांचे सत्कार केले आहेत.

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम

# स्वेरीज् डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये रक्तदान शिबिर संपन्न






पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपुर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलीटेक्निक)शी संलग्नित असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'अभियंता दिना'चे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पदविका अभियांत्रिकीच्या जवळपास १५० विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऐच्छीक रक्तदान केले.

शैक्षणिक उपक्रमाबरोबरच विधायक, सामाजिक उपक्रमात स्वेरी नेहमीच हिरीरीने सहभाग घेत असते. 'अभियंता दिना' च्या निमित्ताने स्वेरी संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या 'राष्ट्रीय सेवा योजने' अंतर्गत या ऐच्छीक रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.आकाश पवार, प्रा. सुरज पवार, प्रा. पी. एस गवळी, प्रा.एस.व्ही.सराफ, प्रा. आर. एस. पाटील व प्रा.आर.एन.पाटील यांच्या नेतृत्वाखाली व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर राबविण्यात आले. या शिबिराचे उदघाटन ब्लड बँकचे सचिव अमजदखान पठाण यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ व इतर प्राध्यापकांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मल्लिकार्जुन ब्लड बँके तर्फे रक्त तपासणी, हिमोग्लोबिन व रक्तगट अशा तपासण्या मोफत स्वरुपात करण्यात आल्या. यामध्ये डिप्लोमा इंजिनिआरिंगचे विद्यार्थिनी व प्राध्यापिका असे मिळून एकूण ५० जणांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या रक्तपेढीच्या माध्यमातून पदविका अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, विद्यार्थी व प्राध्यापक असे मिळून जवळपास १५० जणांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांच्या आरोग्याची काळजी संबंधित रक्तपेढीतील वैद्यकीय अधिकारी व त्यांचे कर्मचारी वर्ग घेत होते. रक्तदात्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. रक्तदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्यासाठी स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी परिश्रम घेतले.

### एशियन पेंट अकॅडमीचा समारोप संपन्न

# युपी बिहारच्या लोकांना प्राधान्य स्थानिक पेंटिंग कामगारावर अन्याय नको : वसंत देडे



अक्कलकोट/प्रतिनिधी : स्थानिक पेंटर कामगारांनी प्रत्येकांना चांगली सेवा देऊन प्रामाणिकपणे काम करत आहे.परंतु आपल्याच लोकांनी स्थानिक पेंटर कामगारांना प्राधान्यऐवजी युपी,बिहारच्या लोकांना पेंटिंगचे कामे देत आहे. त्यामुळे स्थानिक लोकांवर अन्याय केला जात आहे.युपी बिहारच्या लोकांचा पेव वाढत आहे.स्थानिक पेंटर कामगारांनी एकत्र येऊन एकजुटीची मोळी बांधून त्यांच्या पुढे प्रभावीपणे लढा दिले पाहिजे असे आवाहन वसंत देडे यांनी केले आहे.एशियन पेंट अकॅडमीच्या वतीने पेंटर कामगारांना प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.या प्रशिक्षणाचे समारोपचे कार्यक्रम लोकापुरे मंगल कार्यालय अक्कलकोट येथे पार पडला.तत्पूर्वी श्री स्वामी समर्थ महाराजांचे प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी शहर व तालुक्यातील पेंटर कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोलताना एशियन पेंट अकॅडमीचे प्रशिक्षणार्थी परेश महाडिक म्हणाले की,एशियन पेंटर कामगारांनी येणाऱ्या प्रत्येकाशी सन्मानाने वागवे, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे,चांगली सेवा देण्याचे पुरेपूर प्रयत्न करावा, तसेच स्थानिक पेंटिंगचे कामगार झोपडीत राहतात आणि युपी,बिहारचे बिल्डिंगच्या खोल्यात राहतात हे योग्य नव्हें..त्याच लोकांना पेंटिंग चे कामे दिले तर स्थानिक कुठे जाणार आणि ते घर बांधणार कधी,

स्थानिक लोकांनी बाहेरच्या लोकांना पेंटिंगचे कामे देण्याऐवजी स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे असे ते म्हणाले.पुढे बोलताना लहुजी पेंटिंग कामगार युनियनचे संस्थापक अध्यक्ष वसंत देडे यांनी म्हणाले की, आपण कुठल्या कंपनीचे मालक नाहीत. पण त्या कंपनीचा घटक मात्र जरूर आहोत. एखाद्या कंपनीने आपल्या मजूर पेंटर कामगाराकडे कानाडोळा करून एखादी योजना राबवण्याकडे दुर्लक्ष केल्यास त्या कंपनीला धडा शिकवण्याचे काम आपल्या सर्वांच्या एकजुटीने होऊ शकतो.यावेळी लहुजी पेंटिंग युनियन कामगार संघटनेचे उपाध्यक्ष चंद्रकांत हन्नुरे,प्रशिक्षक परेश महाडिकय, प्रशिक्षणार्थी सुपरवायझर आदित्य सोळसकर, खाजाप्पा गायकवाड,संजय सरडगी,शिवाजी देडे,अंकुश बेंद्रे,मौला सुतार,देवेंद्र शिंदे,कृष्णा देडे, सद्दाम शेख,पोलीस पाटील उमेश देडे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान माध्यमातून महिलांच्या योजना प्रभावीपणे राबवणार : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

### केंद्र व राज्य शासनाच्या महिलांकरिता असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार

मुंबई : महिलांना संघटीत करणे, प्रशिक्षित करणे, स्वावलंबी करणे, महिलासंदर्भातील शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अंमलबजावणी करणे, सर्व शासकीय यंत्रणांचे प्रतिनिधी एकत्र येऊन योजनांचे लाभ लाभार्थ्यांना देणे या उद्देशाने सर्व जिल्ह्यांमध्ये दि. २ ऑक्टोबर, २०२३ ते दि. १ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत राज्यामध्ये मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे,अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, विभागाचे सचिव, यांच्या माध्यमातून संनियंत्रण होणार आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनकल्याण कक्षामार्फत समन्वय साधण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरती जिल्हाधिकारी तर शहरी भागाकरिता जिल्हा सहआयुक्त (नगर प्रशासन) या सर्व योजनेचे संनियंत्रण करतील.

या अभियानाचे संनियंत्रण व मासिक आढावा घेवून त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना सादर करण्यात येईल, विभागाचे सचिव हे राज्याचे समन्वय नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी राज्य स्तरावर एका विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

या अभियानात राज्यातील सर्व जिल्ह्यातील शक्ती गटांना आणि महिला बचत गटांना शासनाच्या विविध विभागांच्या योजनांची माहिती देणे, विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांची पात्रता तपासून प्रस्तावित लाभार्थी महिलांची यादी तयार करणे, योजनांचे लाभ घेण्यासाठी संबंधितांकडून अर्ज भरून घेणे, ही प्रक्रिया करुन प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान अडीच लाख महिलांना या योजनेच्या माध्यमातून जोडण्यात येणार तालुकास्तरावर तीस हजार व प्रत्येक गावात २०० महिला अभियानात जोडल्या जातील असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर शहरी भागातील याच प्रकारे काम करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध शासकीय योजनांचा लाभ, महिलांना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, महिलांसाठी आरोग्य शिबिर, रोजगार मेळावा, विविध सरकारी विभाग व महामंडळाच्या योजनांचे स्टॉल, बचत गटांची नोंदणी, सखी किटचे वाटप, शक्ती गटांची महिला बचत गटांची जोडणी, सामाजिक उत्तरदायित्व योजनेतून महिलांना वैयक्तिक लाभ देणे, उद्योग उभारणीस अर्थसहाय्य करणे, महिला उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, प्रोत्साहन पर पारितोषिक वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी आणि माहिती प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यासाठी जनजागृती मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांचे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार यापूर्वी रु. ५० लाखापर्यंत होते ते २ कोटी रुपयांनी वाढविण्यात आले आहेत.या धोरणामुळे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा.आमदार यांच्या स्वेच्छाधिकारात २० लाख रुपयांचा निधी महिला विकासाच्या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२३-२४ अंतर्गत मुख्यमंत्री महिला सशक्तीकरणासाठी जिल्ह्याच्या नियतव्ययात १ टक्का निधी उपलब्ध करुन दिला जाईल. तसेच शासनाच्या सध्या कार्यरत असलेल्या योजना देखील प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत.

देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये महिलांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.महिला सक्षमीकरणासाठी केंद्र राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजना अधिक लोकाभिमुख करून महिलांना संघटित करून, प्रशिक्षण देऊन, आर्थिक सक्षमीकरण करणे, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना एकत्रितपणे एकाच छत्राखाली राबविण्यात यावेत यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

# पुणे-सातारा महामार्गावर चार अपघातात दोन ठार, एक जखमी

वाई : पुणे बंगळूर महामार्गावर खंबाटकी बोगदा ओलांडून पुण्याकडे जाताना एस वळणावर झालेल्या चार अपघातात दोन ठार एक जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. महामार्गावर वाहनांची मोठी गर्दी अद्यापही कायम आहे.सातारा व पुण्याकडे जाणारी वाहतूक एकदम संथ गतीने सुरु आहे.वाहतूक सुरळीत करण्यासाठी पुण्याकडून साताराकडे जाणारी वाहतूक शिरवळ येथील पंढरपूर फाट्यावरून लोणंदमार्गे साताऱ्याकडे वळवली आहे. पुणे सातारा महामार्गावर खंबाटकी बोगदा ओलांडून पुण्याकडे जाताना एस वळणावर झालेल्या अपघातात एक दुचाकी घसरून त्यावरील युवक युवती माल ट्रक खाली येऊन जागीच ठार झाले.त्यांच्या बाबत जास्य माहिती उपलब्ध झाली नाही.अन्य अपघातात एक जण जखमी झाला.या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले.खंडाळा,महामार्ग व भुईंज पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत.पुणे सातारा रस्त्यावर व खंबाटकी घाट व बोगदा मार्गावर अनेक वाहने बंद पडल्याने वाहतूक कोंडी झाली आहे.